स्थापना दि. १७ ऑगस्ट १९८४
# लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., लातूर
मुख्य कार्यालय, टिळक नगर, मेन रोड, लातूर.
फोन नं.(पी.बी.एक्स) (०२३८२) २४५१३०, २४३१३१, २४३१४३, २५६९१९. कार्यकारी संचालक ०२३८२-२४३६४७
फॅक्स ०२३८२-२४२१८३. ई-मेल admin@laturdccb.com

2025 International Year of Cooperatives
Cooperatives Build a Better World

## -: जाहिर सुचना / Notification :-

लिपीक (लेखनीक), शिपाई / Subgrade (Multipurpose support Staff), व वाहन चालक (Driver) पदाच्या मुलाखतीस व कागदपत्र पडताळणी पात्र उमेदवारांकरीता महत्वाच्या सुचना.

- दि. लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., लातूर बँकेच्या लिपीक (लेखनीक), शिपाई / Subgrade (Multipurpose support Staff), व वाहन चालक (Driver) पदांकरीता ऑनलाईन परिक्षा दि. २८.०३.२०२६ रोजी घेणेत आलेली होती.
- ऑनलाईन परिक्षेत पात्र होणाऱ्या गुणांचे गुणानुक्रमे नमुद पदसंख्येच्या १:३ प्रमाणानुसार मुलाखतीस पात्र उमेदवारांची यादी (परिक्षेचा बैठक क्रमांक) बँकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेत आलेली आहे.
- मुलाखतीस पात्र उमेदवारांना मुळ कागदपत्र पडताळणी व मुलाखतीसाठीचे मुलाखत पत्र, मुलाखतीचा दिनांक, वेळ व ठिकाण स्वतंत्रपणे उमेदवारांच्या नोंदणीकृत ई-मेल आय.डी. वर व सुचना एस.एम.एस. द्वारे संदेश पाठविणेत आलेले आहेत.
- उमेदवारांनी स्वतःच्या ऑनलाईन लॉगीन आय.डी. द्वारे मुलाखत पत्र डाऊनलोड करावे. मुलाखत पत्रातील नमुद सुचनांचे काटेकोरपणे पालन करून मुलाखतीस निर्धारीत वेळेत उपस्थित राहणे बंधनकारक आहे.
- लिपीक (लेखनीक), शिपाई / Subgrade (Multipurpose support Staff), व वाहन चालक (Driver) पदांचे कागदपत्र पडताळणी व मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची मुलाखत दि.२६.०६.२०२६ ते २९.०६.२०२६ या कालावधीत बँकेचे मुख्यालय, व बँक शाखा गुळ मार्केट या ठिकाणी पॅनल १ ते ४ नुसार या ठिकाणी आयोजित करणेत आलेली आहे.
- मुलाखत पत्रात नमुद उमेदवारांना कागदपत्र / प्रमाणपत्र पडताळणी पुरविणेत येणाऱ्या चेकलिस्ट (Check List) प्रमाणे सादर करणे अनिवार्य आहे.
- उमेदवारांच्या बायोमॅट्रीक नोंदीची सत्यता, पडताळणी मुलाखतीच्या वेळी करणेत येणार आहे खालील बाबींची उमेदवारांनी दक्षता घेणेत यावी.
  १. ऑनलाईन परिक्षेच्या वेळी ज्या बोटांचे ठसे दिलेली असतील त्याच बोटांच्या ठशांचे आधारे मुलाखतीवेळी उमेदवारांची सत्यता पडताळणी करणेत येणार आहे.
  २. उमेदवारांच्या बोटांवर कसल्याही थर (शाई, मेंहेंदी अथवा रंग इ.) असेल तर काढून टाकावा. मुलाखतीच्या पुर्वी सदर थर पुर्णपणे गेलेला आहे याची खात्री करून घ्यावी.
- कागदपत्र पडताळणी वेळी उमेदवाराने आवश्यक मुळ कागदपत्रे / गुणपत्रक / प्रमाणपत्र सादर न केल्यास सदर उमेदवारास कागदपत्रे पुनः सादर करणेस कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही. मुळ कागदपत्रे / प्रमाणपत्र म्हणून छायांकित (Xerox) / मोबाईल / ऑनलाईन या द्वारे पडताळणी करीता ग्राह्य धरली जाणार नाहीत. असे उमेदवार मुलाखतीस पात्र राहणार नाहीत.
- महाराष्ट्र शासनाकडील दि. ३०.११.२०२५ व दि. ०८.०५.२०२६ रोजीचे शासन निर्णयानुसार लातूर जिल्ह्यातील मुळ रहिवासी असणाऱ्या उमेदवारांकरीता ७०% पदे राखीव असून उर्वरीत ३०% पदे जिल्ह्याबाहेरील उमेदवारांकरीता राखीव राहतील. लातूर जिल्ह्याबाहेरील पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास जिल्ह्यातील पात्र उमेदवारांकडून सदर पदे भरती करणेत येतील.

..२.

➢ उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणी वेळी मुळ अधिवास प्रमाणपत्र (रहिवासी / Domicile) व वयाचा दाखला दाखल करणे बंधनकारक आहे.

➢ बँकेने दि. १८.१२.२०२५ रोजीचे जाहिरातीमध्ये नमुद केलेली लिपीक (लेखनीक) पदांचे वयोमर्यादा किमान २१ वर्षे व कमाल ३० वर्षे, शिपाई / Subgrade (Multipurpose support Staff), व वाहन चालक (Driver) पदांकरीता वयोमर्यादा किमान १९ वर्षे व कमाल २८ वर्षे व शैक्षणीक अर्हता दि. ३०.११.२०२५ रोजीची ग्राह्य धरणेत येणार आहे. त्यांचे १२ वी व पदवी कालावधीतील सरासरी किमान ६०% गुण मिळून उत्तीर्ण असावा. शासन मान्यता प्राप्त संस्थेचे किमान ९० दिवसांचे तत्सम संगणक प्रमाणपत्र / MSCIT दि. ३०.११.२०२५ रोजी धारण करणारे असे उमेदवार मुलाखतीस पात्र राहतील. शैक्षणिक अर्हता दि. ३०.११.२०२५ नंतरचे प्रमाणपत्र अवैद्य ठरविणेत येऊन उमेदवारास अपात्र करणेत येईल.

➢ बँकेने गठीत केलेल्या समिती (Penal १ ते ४) मार्फत उमेदवारांची मुलाखत घेणेत येईल. मुलाखतीस एकूण १० गुण असून ५ गुण (मौखीक) मुलाखतीसाठी व ५ गुण शैक्षणीक अर्हतेनुसार देण्यात येतील.

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | गुण |
|---|---|---|
| १ | एम.कॉम./एम.बी.ए. (बँकींग किंवा फायनान्स) /एम.ई. (संगणक) किंवा (आय.टी.) / एम.एस.सी. (ॲग्री)/ एल.एल.बी./एल.एल.एम किमान ६०% गुण मिळवून उत्तीर्ण असल्यास | १ |
| २ | सीएआयआयबी /जेएआयआयबी / डी.टी.एल. (Diploma in Taxation Laws) | १ |
| ३ | जी.डी.सी. ॲण्ड ए. व एच.डी.सी.एम.<br>(किमान ६०% गुण मिळवुन पहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण असावा) | १ |
| ४ | बँकेतील कामकाजाचा किमान तीन वर्षाचा अनुभव<br>(पतसंस्था, निधी पतसंस्था, मल्टिस्टेट पतसंस्था, सर्व प्रकारच्या फायनान्स कंपन्या / संस्थांमधील अनुभव दाखला ग्राह्य धरता येणार नाही.) | २ |
| | एकूण | ५ |

➢ शिपाई / Sub Grade (Multipurpose support Staff) व वाहन चालक
टिप : शिपाई / Subgrade (Multipurpose Support Staff / वाहन चालक पदास शैक्षणीक अर्हतेसाठी पाच (५) गुणांचे भारांकन लागु राहणार नाही. त्यांची मौखिक परिक्षा दहा (१०) गुणांची असेल.

➢ सदर मुलाखत प्रवेशपत्र हे नियुक्तीपत्र नाही. सबब सदर मुलाखत प्रवेशपत्राच्या आधारे उमेदवारास नियुक्ती संदर्भात कोणताही दावा करता येणार नाही.

➢ उमेदवाराने कागदपत्र पडताळणी व मुलाखतीस स्वखर्चाने वेळेवर उपस्थित राहणे बंधनकारक आहे. उमेदवाराने विहित केलेल्या वेळेत हजर राहणे बंधनकारक राहील व संपुर्ण मौखिक परिक्षा पुर्ण झाल्याशिवाय कार्यालय सोडू नये.

➢ उमेदवाराने सरळसेवा भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने बँकेच्या संकेत स्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करणेत आलेल्या सुचनांचे अवलोकन करून पालन करावे

दिनांक : २०.०६.२०२६

कार्यकारी संचालक

टिप : दि. २६.०६.२०२६ ते २९.०६.२०२६ या कालावधीतील कागदपत्र पडताळणी व मुलाखतीस पात्र उमेदवारांची पॅनल १ ते ४ निहाय सुची व मुलाखतपत्र तसेच चेकलिस्ट जोडलेले आहे.

..२.

F:\SHIRISH\NEW RECRUITMENT २०२५-२६\All Advertise.doc